# पाहिजेत

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सातारा विभागामध्ये खालील पदासाठी मानद तत्त्वावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| पदाचे नाव | समुपदेशक (COUNSELLOR) एकुण ०३ जागा. |
| शैक्षणिक अर्हता | मान्यताप्राप्त विदयापिठाची / संस्थेची समाजकार्य या विषयांकीत पदव्युत्तर पदवी M.S.W. किंवा मान्यताप्राप्त विदयापिठाची/ संस्थेची मानसशास्त्र या प्रमुख विषयातील कला शाखेची पदव्युत्तर पदवीच (M.A.Psychology) अधिक समुपदेशन मानसशास्त्र विषयातील पदवीका Advance Diploma in psychology |
| अनुभव | समुपदेशन क्षेत्रातील शासकीय / निमशासकीय / मोठया खाजगी संस्थांमधील किमान २ वर्षाचा अनुभव. |
| इतर अटी व शर्ती | रा. प. महामंडळाच्या सातारा विभागामध्ये आवश्यकतेनुसार समुपदेशकाची मानद तत्वावर नेमणूक करण्यात येईल व त्याकरीता मासिक मानधन रु.४०००/- देण्यात येईल. प्रथम १ वर्षासाठी सदर पदी मानद तत्वावर नेमणूक देण्यात येईल. सदर काळात केलेल्या कामाचा आढावा घेवून पुढे सदर नेमणूक चालू ठेवायची किंवा नाही हे ठरविण्यात येईल. |
| कर्तव्य | रा. प. महामंडळातील विशेषतः चालक कर्मचा-यांमध्ये समुपदेशनाद्वारे मानसिक ताणतणावाचे निवारण करणे, त्यांच्याशी वैयक्तिक संवाद साधून, अडीअडचणी समजाऊन घेऊन वैयक्तिक पातळीवर निराकरण करणे व आवश्यकता वाटल्यास वरिष्ठ पातळीवर अहवाल पाठवून पुढील उपचाराची गरज निदर्शनास आणून देणे. तसेच आगारास महिन्यातून किमान ३ वेळा भेटी देणे. |
| नेमणूकीचा कालावधी | सदर नेमणूक निव्वळ मानद तत्वावर असून नेमणूकीच्या कालावधी एक वर्ष राहील. आवश्यकता वाटल्यास समुपदेशकाचा कार्यकाल विचारात घेऊन नेमणूकीचा कालावधी संबंधित विभागामार्फत वाढविण्यात येईल. सदर नियुक्ती मानद तत्वावर असल्याने रा.प. महामंडळाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमीत सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचे अधिकार/हक्क अर्जदारास /समुपदेशकास नसतील. तसेच सक्षम प्राधिकारी /नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत समुपदेशकाची सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. |
| अर्ज करण्याची पद्धत | वरील अर्हता प्राप्त करणा-या उमेदवारांनी फुलस्केप पेपरवर अर्ज टंकलिखीत करुन स्वतःचा पासपोर्ट साईज रंगीत फोटो स्वतःच्या सहीसह त्यावर चिकटवावा व अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, सर्व शैक्षणिक अर्हते बाबत प्रमाणपत्र व गुणपत्रक व अनुभवाचा दाखला (प्रमाणित सत्यप्रतीसह) जोडावा. सदर अर्ज आपण ज्या विभागात समुपदेशक म्हणून काम करण्यास इच्छुक असाल त्या विभागातील रा. प. महामंडळाच्या विभाग नियंत्रकाच्या नांवे विभागीय कार्यालय यांचेकडे दिनांक १८/३/२४ पर्यंत खालील पत्त्यावर पोहोचेल या बेताने पाठवावा. |
| पत्ता | विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, म.रा.मा. प. महामंडळ विभागीय कार्यालय, बस स्थानकाजवळ सेव्हन स्टार बिल्डिंगच्या पाठीमागे, रविवार पेठ सातारा. ४१५ ००१ |

**विभाग नियंत्रक,**
**रा.प.सातारा**